I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# ग्रामीण स्त्रियांची उद्योजकता

**डॉ. सौ. गीता रा. आंबटकर**
गृहअर्थशास्त्र, विभाग प्रमुख, संताजी महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना :**

भारतामधील उद्योजकतेच्या चळवळीचा प्रारंभ स्वातंत्र्योत्तर काळात, आर्थिक विकासाकरीता आर्थिक नियोजनाच्या तंत्राचा अवलंब केल्यांनंतर घडुन आला. देशातील उद्योजकता चळवळीला आता योग्य दिशा प्राप्त झाली असून, सरकारने विविध पातळयांवरून केलेल्या प्रयत्नांमुळे, उद्योजकता चळवळीला गति प्राप्त झाली आहे. देशात उद्योजकतेचा सर्वांगीण विकास व्हावा आणि स्त्रियांनाही स्वयंरोजगार मिळावा, त्यांना उत्पन्नाचा सन्माननीय स्त्रोत उपलब्ध व्हावा आणि त्यांच्या क्षमतेचा देशाच्या विकासाकरीता उपयोग करून घेणे शक्य व्हावे, हया उद्देशाने स्त्रियांनी उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करून नवनवी आवाहने स्वीकारण्याकरीता प्रवृत्त व्हावे, हयाकरीता प्रयत्न करण्यात आले. भारतामधील स्त्रियांचा उद्योजकता चळवळ ही प्रामुख्याने मोठया शहरांतील किंवा नागरी विभागातील सुविद्य, संपन्न, सासरी व्यावसायिक स्वरूपाची कौटुंबिक पार्श्वभुमी असलेल्या आणि समाजात स्वतःचे स्थान निर्माण करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या स्त्रियांपुरती मर्यादित आहे. स्त्रियांची उद्योजकता शहरांमधील, उच्च सामाजिक स्थान असलेल्या, स्वतःला व्यस्त ठेवण्याची इच्छा बाळगणाऱ्या, महत्वाकांक्षी स्त्रियांपुरतीच सीमीत असणे, ही बाब स्त्रियांच्या उद्योजकता चळवळीची मर्यादा ठरते.

उद्योजकता ही शेवटी व्यक्तीची प्रवृत्ती असते. ही प्रवृत्ती संबंधीत व्यक्तीच्या मानसिंकतेवर निर्भर असते. ही प्रवृत्ती जशी पुरूषांमध्ये असते तशीच ती स्त्रियांमध्येही असते, ही प्रवृत्ती शहरांत राहणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांमध्ये जशी असते तशीच ती ग्रामीण परीसरात राहणाऱ्या कष्टकरी महिलांमध्येही असते. खेडेविभागात किंवा ग्रामीण परिसरात राहुन एखादा उपक्रम संघटित करणाऱ्या स्त्रीला 'ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक' अशी संज्ञा देता येईल.

**ग्रामीण परिसरातील उद्योजक स्त्रियांचे प्रकार :**

ग्रामीण परिसरात राहणाऱ्या आणि शेती तसेच विभिन्न ग्रामोद्योग किंवा कुटीर उद्योगांमध्ये काम करणाऱ्या किंवा एखादया व्यवसायाशी निगडीत असणाऱ्या स्त्रिया हा आपल्या देशातील स्त्रियांच्या उद्योजकतेचा फार मोठा स्त्रोत ठरतो.

ग्रामीण परिसरातील उपक्रमशील स्त्रियांचे स्थूलमानाने पुढील प्रकार पडतात.

1. आर्थिक हलाखीमुळे नवीन उपक्रमांची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या स्त्रिया. हया ठिकाणी प्रतिकुल आर्थिक परिस्थितीवर मात करणे आणि कुटुंबाकरीता उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे, ही हया प्रकारच्या ग्रामीण स्त्री उद्योजकांची महत्वाची प्रेरणा ठरते.
2. कुटुबांच्या परंपरागत व्यावसायिक कौशल्याचा वारसा प्राप्त झालेल्या स्त्रिया. काही कुटुंबांमध्ये विशिष्ट उद्योग किंवा व्यवसाय पंरपंरेने सुरू असतात. उदा. नागपुर जिल्हयातील कोष्टी जातीच्या कुटुंबामध्ये हातमागाचा उद्योग व भिंवडी, मालेगांव इ. शहरांमध्ये यंत्रमागाचा उद्योग ही अनेक कुटुंबाची व्यावसायिक परंपरा आहे. पुरूषांची व्यसनाधीनता, कर्त्या पुरूषांचे निधन, पुरूषांचे नाकर्तेपण, इ. कारणांमुळे तसेच प्रतिकूल बहिर्गत कारणांमुळे, कुटुबांच्या परंपरागत व्यवसायाची घडी विस्कटते. अशा वेळेस परिस्थितीच्या रेटयामुळे उपक्रमशील प्रवृत्तीच्या स्त्रियांना पुढाकार घेणे भाग पडते. कुटुंबाची विस्कटलेली आर्थिक घडी नीट बसविणे ही हया प्रकारच्या स्त्री उद्योजकांची प्रेरणा असते. हया स्त्रियांमध्ये परंपरागत औद्योगिक कौशल्य असते. नवीन परिस्थितीमध्ये आपला उपक्रम सुरू करून, त्याला नफा मिळवून देण्याच्या परिस्थितीमध्ये आणण्याचे कठीण काम हया स्त्री उद्योजक करीत असतात.
3. सिध्दी प्रेरणा, सत्ताप्राप्तीची प्रेरणा, आपुलकीची प्रेरणा, विस्तार प्रेरणा – अशा विविध प्रेरणांमुळे अभिप्रेरित झालेल्या स्त्रिया. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या, कुटुबांच्या उपजीवीकेसाठी अविरत कष्ट करणाऱ्या, सर्व प्रकारच्या पिळवणुकीशी सामना करणाऱ्या तसेच निर्दयी निसर्ग व प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देणाऱ्याा स्त्रियाही महत्त्वाकांक्षी असू शकतात. हया स्त्रियांना मार्गदर्शन, साहाय्य व समर्थनाची तेवढी आवश्यकता असते.
4. स्वयंरोजगाराचे साधन म्हणून उपक्रमांचे संचालन करणाऱ्या स्त्रिया. ग्रामीण विभागात बेकरीची समस्या ही शहरातील बेकारी येवढीच उग्र असते. पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही काम हवे असते. ग्रामीण परिसरात अतिरिक्त रोजगाराच्या सोयी जवळपास नसतातच. अशा परिस्थितीमध्ये स्वयंरोजगार मिळविणे, हा एकच पर्याय ग्रामीण स्त्रियांना उपलब्ध असतो. स्वयंरोजगार मिळविणे ही अनेक उपक्रमी ग्रामीण महिलांची प्रमुख प्रेरणा असते.
5. सरकारी यंत्रणांच्या संपर्कात आल्यामुळे अभिप्रेरित होणाऱ्याा स्त्रिया. कांही ग्रामीण स्त्रियांमध्ये नेतृत्वाचे

उपजतच गुण असतात. अलिकडे पंचायती संस्थांमध्ये स्त्रियांकरीता अधिकाराची विविध पदे राखीव असतात. हया पदांवर काम करण्याची संधी मिळणाऱ्याा स्त्रियांमध्ये नेतृत्वाचे गुण अधिकच विकसित होतात. हया स्त्रिया अधिकार पदांवरून त्यांची कामें करीत असतांना विभिन्न सरकारी यंत्रणांच्या संपर्कात येतात. अशा स्त्रियांना योग्य सल्ला आणि तांत्रिक व आर्थिक साहाय्य मिळाल्यास, त्या उपक्रमांची स्थापना करून हया उपक्रमांचे स्वतंत्रपणे संचालन करण्याचे आवाहन स्वीकारण्यासाठी सहजपणे प्रवृत्त होतात.

**ग्रामीण परिसरातील उद्योजक स्त्रियांचे वेगळेपण :**

स्त्रियांच्या उद्योजकतेंचा विकास करण्यासाठी धोरणांची आखणी करीत असतांना शहरांमध्ये राहणाऱ्या उद्याोजक स्त्रिया व ग्रामीण परिसरात राहणाऱ्या व कार्य करणाऱ्या उद्योजक स्त्रियांचा वेगवेगळा विचार करावा लागतो. उद्योजकतेची वृत्ती हा एक सन्माननीय अपवाद वगळल्यास, ग्रामीण परिसरात राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया हया शहरांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांपेक्षा अनेक बाबतीत कमालीच्या भिन्न आहेत. ही भिन्नता किंवा ग्रामीण परिसरातील उद्योजक स्त्रियांचे वेगळेपण पुढे थोडक्यात अधोरेखित केले आहे.

1. शहरांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया सुशिक्षित, येवढेच नव्हे तर सुविद्य असतात. खेडयांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्याक उद्योजक स्त्रिया स्वाभाविकपणे निरक्षर असतात.
2. शहरांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया हया मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्ग किंवा संपन्न कूटूंबातून आलेल्या असतात. हया उलट खेडयांमधील बहुसंख्यांक उद्योजक स्त्रिया झगडणाऱ्या, कष्ट करणाऱ्या कूटूंबामधून आलेल्या असतात.
3. शहरांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्याक उद्योजक स्त्रियांचे माहेर उपजीविकेसाठी नोकरीवर अवलंबून असणारे तर सासर व्यवसायाची कौटूंबिक पार्श्वभूमी असणारे असते. खेडयांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांच्या माहेरी किंवा सासरी नोकरी किंवा व्यवसायाची कौटूंबिक पार्श्वभूमी असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. खेडयांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांचे माहेर व सासर उपजीविकेसाठी सर्वस्वी किंवा अंशतः शेतीवर निर्भर असणारे असते.
4. शहरांमधील बहुतेक स्त्रियांना त्या उद्योजक बनण्यापूर्वी त्यांना फुरसतीचा किंवा रिकामा वेळ आहे, हया वेळेचा कसा उपयोग करावयाचा हा प्रश्न आहे व म्हणून त्या उद्योजकतेकडे वळलेल्या असतात. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या स्त्रीयांच्या बाबतीत **'फुरसतीचा वेळ'** (स्मपेनतम) हा शब्द त्यांच्या शब्दकोषातच नसतो. सूर्योदयापूर्वी आपला जीवनक्रम सुरू करणाऱ्या ग्रामीण स्त्रियांचे दैनिक कामकाज सूर्यास्तानंतरही संपत नाही. त्यामूळे स्वाभाविकच ग्रामीण स्त्रियांच्या बाबतीत **'फुरसतीचा वेळ'** ही एक मोठी काल्पनिक चैन ठरते.
5. शहरात राहणाऱ्या उद्योजक स़्त्रियांच्या बाबतीत स्वतःला व्यस्त ठेवणे, वैयक्तिक महत्वाकांक्षा पूर्ण करणे, स्वतःची आवड किंवा हौस जोपासणे, पैसे मिळविणे, आवाहन स्वीकारणे–अशा त्यांच्या प्रेरणा आहेत. ग्रामीण परिसरात राहून काम करणाऱ्या उद्योजक स्त्रियांच्या बाबतीत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीवर मात करणे, कुटूंबाकरिता उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे, कूटूंबांच्या परंपरागत व्यवसायाची विस्कटलेली घडी नव्याने नीट बसविणे, परंपरागत औद्योगिक कौशल्यांचा वारसा सांभाळणे, स्वयंरोजगार मिळविणे, हया त्यांच्या प्रमुख प्रेरणा असतात.
6. शहरात राहणाऱ्या बहुसंख्यांक उद्योजक स्त्रियांची घरची आर्थिक परिस्थिती चांगली असते. हया उद्योजक स्त्रियांना घरातील पुरूषांकडून संपूर्ण किंवा अंशतः सरंक्षण व साहाय्य होते. हया स्त्रिया सुविद्य असल्यामूळे त्या अत्यंत आत्मविश्वासाने बाहेरच्या जगात वावरतात, अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व साहाय्य मिळवितात आणि स्वतःच्या प्रश्नांची सोडवणूक करतात. हयाउलट ग्रामीण परिसरातील उद्योजक स्त्रियांची परिस्थिती असते. बहुसंख्यांक उद्योजक स्त्रियांना खडतर आर्थिक परिस्थितीशी प्रखरतेने सामना करावा लागतो, पुरूषांचा विरोध मोडून काढावा लागतो, प्रथा, परंपरा व चालीरीतींशी संबंधित अडथळयामधून मार्ग काढावा लागतो आणि उपहास व उपेक्षा सहन करीत करीत स्वतःचे प्रश्न निर्धाराने सोडवावे लागतात.

**ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांपुढे असणाऱ्या समस्या**

स्त्री उद्योजकांना इतर उद्योजकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांना तोंड द्यावे लागते व शिवाय हया स्त्री उद्योजकांना त्यांच्या स्त्री असण्यामुळेही काही वेगळया समस्यांना सामोरे जावे लागते. ग्रामीण परिसरातील स्त्री

उद्योजकांना वर उल्लेखिलेल्या समस्यांना तोंड द्यावे लागते हे तर खरेच, पण शिवाय हया स्त्री उद्योजकांना आणखीही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

1) दारिद्रय, विषमता व विवशता
2) निरक्षता, शिक्षणाचा अभाव
3) उपयुक्त माहितीचा अभाव
4) जोखीम
5) प्रशिक्षणाचा अभाव
6) असुरक्षितता
7) बाजारपेठेबद्दल अज्ञान
8) वस्तूंची कमी गुणवत्ता, जास्त उत्पादनखर्च

**ग्रमीण स्त्रियांच्या उद्योजकतेचा विकास करण्यासाठी उपासयोजना**

आपल्या देशात उद्योजकतेचा सर्वागीण विकास घडवून आणण्याकरीता ग्रामीण स्त्रियांच्या उद्योजकतेचा विकास होण्याची फार गरज आहे. ग्रामीण स्त्रियांना उद्योजकतेची समस्या कशी गुंतागुतीची आहे हे वर विशद केले आहे. ग्रामीण स्त्रियांच्या उद्योजकतेचा जलद व पध्दतशीर विकास घडवून आणण्याकरीता सरकारी पातळीवरून विशेष स्वरूपाची उपाययोजना करणे फार अगत्याचे आहे. काही उपाय पुढे सुचविले आहेत.

1. विशिष्ट ग्रामीण स्त्रियांमध्ये उद्योजकतेची प्रवृत्ती आहे. याबद्दल खात्री करून घेतल्याशिवाय, उद्योजकतेच्या विकासाकरीता योग्य ती उपाययोजना केली जावू शकत नाही हयाकरीता उद्योजकता संवर्धनाचे कार्य करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सरकारी यंत्रणांनी आपले कार्यक्षेत्र व कार्याची व्याप्ती वाढवून ग्रामीण परिसरातील स्त्रियांशी प्रत्यक्ष स्वरूपाचा संपर्क निर्माण करण्याची फार आवश्यकता आहे.
2. खेडयाच्या पातळीवर स्त्रियांच्या संघटना निर्माण करायला हव्यात. हया संघटनांच्या माध्यमातून ग्रामीण स्त्रियांशी संपर्क साधता येईल. तळपातळीवर कार्य करणाऱ्या स्त्री–संघटनांच्या माध्यमातून उद्योजकतेची प्रवृत्ती असणाऱ्या, आपल्या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्याची आकांक्षा व जिद्द असणाऱ्या, महत्त्वाकांक्षी स्त्रियांचा सहज शोध घेता येईल.
3. ग्रामीण परिसरातील संभाव्य स्त्री उद्योाजकांचा शोध घेतल्यानंतर हया स्त्रियांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था तालुका व जिल्हा पातळीवर करण्यात यावी. लघु उद्योग सेवा संस्था आणि देंश व राज्याच्या पातळीवरून उद्योजकतेचा विकास साधणाऱ्या संघटनांनी हे आवाहन स्वीकारावे. ग्रामीण जनजेच्या विकासाकरीता विभिन्न सरकारी कार्यक्रम कार्यान्वित केले जातात, उदा. एकात्म ग्रामीण विकास कार्यक्रम. हया कार्यक्रमाच्या माध्यमातूनही ग्रामीण स्त्रियांना उद्योजकतेचे प्रशिक्षण देंण्याची व्यवस्था केली जावू शकते.
4. दारिद्रय व प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक उपक्रमाची स्थापना करण्यासाठी पैशाची व्यवस्था करू शकत नाहीत. अशा स्त्रियांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी सरकारने विशेष योजनांचीच आखणी करणे आवश्यक आहे.
5. ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक ज्या प्रकल्पांची उभारणी करणार आहेत ते प्रकल्प शेतीशी संबंधीत असावेत. त्यामुळे अशा प्रकल्पांची उभारणी करण्यात विशेष अडथळे येणार नाहीत. शेतीच्या विकासालाही त्याचा फायदा होईल शिवाय स्त्रियांना आपली नेहमीची कामे करून आणि कुटुंबांची घडी विस्कटु न देता., स्वयंरोजगाराचे साधन निर्माण करता येईल.
6. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या स्त्रियांना साक्षर करण्यासाठी काही योजना आहेत. हया योजनांच्या अंमलबजावणीचा वेग वाढविण्यात यावा. सध्या ग्रामपंचायत, पंचायत समित्या व जिल्हा परिषदेमध्ये स्त्रियांकरिता काही पदे राखीव असतात. स्त्रियांचा राजकारणामधील सहभाग आणि स्त्रियांचे शिक्षण यांमध्ये वाढ घडुन आल्यास, सामाजिक विषमतेची प्रखरता कमी होईल, ग्रामीण स्त्रियांच्या मनात आत्मविश्वास वाढेल आणि सरकारचा विविध योजनांचा फायदा घेण्यासाठी ग्रामीण स्त्रिया पुढे येतील.
7. ग्रामीण स्त्री उद्योजकांना भेडसावणाऱ्याा ज्या समस्या आहेत, त्यामध्ये त्यांच्या उपक्रमांमध्ये उत्पादन झालेल्या वस्तूची विक्री करण्याच्या समस्येबद्दल वर

उल्लेख आला आहे. हया उद्योजकांची ही विशिष्ट समस्या सोडविण्याचे तीन ठळक पर्याय आहेत. पहिला पर्याय प्रत्येक उद्योजकाने आपल्या वस्तूच्या विपणनासाठी स्वतंत्र व्यवस्था करणे हा आहे. दुसरा पर्याय विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील उद्योजकांनी एकत्रित येवुन एक सहकारी संघटना निर्माण करणे व हया सहकारी संघटनेच्या मार्फतीने वस्तूंची विक्री करणें हा आहे. तिसरा पर्याय सरकारी यंत्रणांनी उद्योजकांकडुन वस्तूची खरेदी करून हया वस्तू योग्य बाजारपेठेपर्यंत पोचविणे हा आहे. ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक वस्तूच्या विपणनाच्या समस्येतून मुक्त झाल्यास त्या उत्पादनाचा दर्जा वाढविण्याकडे आपले लक्ष लावू शकतात.

**निष्कर्ष**

ग्रामीण स्त्रियांची उद्योजकता विकसित झाल्यास ग्रामीण परिसरातील स्त्रियांना स्वयंरोजगार उपलब्ध होईल, रोजगाराच्या नवीन सोयी निर्माण होतील, स्त्रियांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होईल, मोसमी बेकारीची तीव्रता कमी होईल, ग्रामीण जीवनात संपन्नता निर्माण होईल व परिणामतः आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेग वाढेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार. डॉ. प्रभाकर देशमुख पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर. 2002.

2) उद्योजकता डॉ. पी. सी. सेजवालकर अमेय प्रकाशन, पुणे 1996

3) लघु उद्योग क्षेत्रातील उद्योजकता, एस. अशोककुमार डिस्कव्हरी पब्लिसिंग हाऊस न्यू दिल्ली. 1990.

4) यशस्वी स्त्री उद्योजक, एन.पी.सिंग व इतर, न्यू दिल्ली 1990

5) उद्योजकता विकास, एम.दिलीप सरवटे, एव्हरेस्ट पब्लिशिंग हाऊस पूणे 1996

6) दैनिक तरूण भारत, नागपूर 25 सप्टेंबर 2016

❖❖❖❖